दै. गोदातीर दि. 30/10/2024

# १२ लाख रुपयांच्या गुटख्यासह वीस लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड-** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा व पोलीस प्रशासनाकडून वाहनांची कसून चौकशी करण्यात येत आहे. भोकर येथील पाळज येथे असलेल्या एसएसटी पॉईंटवर एका वाहनाची तपासणी करत असताना अवैधरित्या १२ लाख ६६ हजार ४०० रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई २८ ऑक्टोबरच्या सायंकाळी ७:३० च्या सुमारास करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लॅश आउट व निवडणुक अनुषंगाने सर्व आंतरराज्य सिमेवर अवैध वाहतुक, शत्र, गुटखा जप्ती इत्यादीची वाहतुक होणार नाही याबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांना सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पाळज येथे दि.२८ आक्टोबर रोजी १९.२५ वाजताचे सुमारास भोकर येथील पोलीस अंमलदार लहु राठोड हे भैंसाकडून येणारे-जाणारे वाहनांची तपासणी करीत असताना त्यांनी भैंसाकडून येणारा महिंद्रा बोलेरो पिकअपची (एमएच ३७ टी ३६०१) थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीत या वाहनात वेगवेगळ्या आकाराच्या नायलॉन व बारदान्याचे पोत्यामध्ये राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला, मानवी शरीरास अपायकारक असलेला पान मसाला व गुटखा एकुण किंमत १२ लाख ६६ हजार ४०० रुपयांचा गुटखा आढळून आला. महिंद्रा बोलेरो पिक अप वाहनासह एकुण किंमत २० लाख ६६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस स्टेशन भोकर येथे चालक अबरार अहमद खान मोहम्मद खानविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दै. प्रजावाणी दि. 30/10/2024

**पोलिसांची गुटखा माफीयाविरुद्ध कारवाई**

# साडेबारा लाखाच्या गुटख्यासह २० लाखाचा मुद्देमाल जप्त

**वार्ताहर • भोकर**



तेलंगानातून महाराष्ट्रात अवैधरित्या विक्रीसाठी येणारा जवळपास साडे बारा लाख रुपयाचा गुटखा पाळज येथील तपासणी नाक्यावर २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे सात वाजताच्या सुमारास पथकाने पकडून वाहनासह वीस लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

राज्य शासनाने गुटख्यावर बंदी घातलेली असतानाही अन्नभेसळ विभागाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षपणामुळे याभागात सर्रास गुटख्याची विक्री सुरु आहे. सध्या विधानसभा आणि नांदेड लोकसभेच्या पोट निवडणुकीसाठी एसएसटी तपासणी नाक्याची स्थापना करण्यात आली. सोमवारी सायंकाळी पथक तपासणी करीत असताना तेलंगणातील म्हैसा येथून महिंद्रा बोलेरो पिकअप (एम. एच .३७ टी ३६०१) हे वाहन भोकरकडे येत होते. नाक्यावर तपासणी पथकाने सदरील वाहनाची तपासणी केली असता वाहनात पान मसाला आणि गुटख्याचे पोते आढळून आले. मोजमाप केले असता सदरील गुटखा १२ लाख ६६ हजार ४०० रुपयांचा असल्याचे दिसून आले. पोलिसांनी गुटख्यासह आठ लाख रुपयांचे वाहन असा २० लाख ६६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदरील कार्यवाही पो.नि. अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव, नामदेव जाधव, प्रकाश वाळवे , लहू राठोड प्रमोद मंगेश शिरसागर यांनी केली. लहू राठोड यां दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी अबरार अहमद ख मोहम्मद खान याच्याविरुद्ध भोकर पोलिस ठा गुन्हा दाखल केला आहे.